MHWS070005742019

दाखल दिनांक : १६/०२/२०१९
नोंदणी दिनांक : १६/०२/२०१९
न्यायनिर्णय दिनांक : २८/०७/२०२६
कालावधी : ०७वर्ष ०५म. १२दि.

# कारंजा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : पी. डी. देवरे)

## न्यायनिर्णय

**(दिनांक २८ जुलै २०२६ ला घोषित)**

**नि.फौ ख.क्र. ३८/२०१९** **निशाणी क्र.४७**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | प्रथम खबर अहवाल / गुन्हा व पोलीस ठाणे तपशील |
| **अभियोगपक्ष** | महाराष्ट्र शासन द्वारा<br>कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन,<br>ता. कारंजा (लाड), जि. वाशिम.<br>गु.र. न. ६३/२०१८ |
| **अभियोगपक्षाचे मा. विधीज्ञ** | सहा. सरकारी अभियोक्ता – श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे. |
| **आरोपी** | **गणेश सुरेश ढिलोरकर**<br>वय : ३२ वर्ष, व्यवसाय : शेती,<br>रा. यावर्डी ता. कारंजा, जि. वाशिम |
| **आरोपीचे मा. विधीज्ञ** | श्री. एम. सी. खंडारे |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्ह्याचा दिनांक | १४/०७/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १४/०७/२०१८ |
| दोषारोपपत्र दिनांक | २९/०९/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १४/०९/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४/०३/२०२५ |
| न्यायनिर्णयास राखीव ठेवल्याचा दिनांक | ------- |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | २८/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास | लागू नाही |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोषमुक्त/ शिक्षा | दिलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **गणेश सुरेश ढिलोरकर** | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटिस व समजपत्र | १६/०२/२०१९ | कलम ३४१, २९४, ३२३ व ५०६ भा.दं.सं. | निर्दोष | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक २८ जुलै २०२६ ला घोषित)

१. सदरचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३४१, २९४, ३२३ व ५०६ अन्वये गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

## <u>अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे</u> –

०२. दिनांक १४/०७/२०१८ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी व प्रविण ठाकरे हे दोघे शेतातून येत असताना झोपडपट्टीजवळ आरोपी अचानक फिर्यादीच्या अंगावर आला व जोरात फिर्यादीच्या डोक्यात बुक्की मारुन त्यांना नालीत पाडले. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस विट मारायला घेतली तेव्हा फिर्यादीने एका हाताने विट धरली. आरोपीने फिर्यादीला 'हरामखोर, फोकणीचे हो, तीन दिवसात तुझा व तुझ्या घरच्यांचा खत्मा करतो,' अशी धमकी दिली. त्यावेळी काही लोकांनी त्यांचे भांडण सोडविले. त्यानंतर पुन्हा आरोपीने फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी सुरेश कदम याने आरोपीला समजावले. त्यामुळे फिर्यादीने सदर घटनेबाबत आरोपीविरुध्द कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनला लेखी रिपोर्ट दाखल केला.

०३. सदरच्या लेखी रिपोर्टवरुन कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ६३/२०१८ भा.दं.सं. कलम ३४१, २९४, ५०६ व ३२३ नुसार नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अंमलदार शेषराव जाधव, पो. हे. कॉ. यांनी प्रकरणाचा पुढील तपास पुर्ण करुन वरील कलमान्वये आरोपीविरूध्द अंतिम अहवाल न्यायालयात दाखल केला.

०४. सदर खटल्यात दोषारोपपत्राचे अवलोकन करुन निशाणी क्र. १० वर आरोपीविरुध्द भा.दं.सं. कलम ३४१, ३२३, २९४ व ५०६ करिता दोषारोप निश्चित केला. आरोपीने त्याचे निवेदन नि. क्र. ११ नुसार गुन्हा नाकबूल करून संपरिक्षेची तयारी दर्शविली.

०५. आरोपीवरील आरोप शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने न्यायनिर्णयाच्या भाग–क मधील साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

०६. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणेचे स्पष्टीकरणात्मक निवेदन निशाणी क्र. ४० वर नोंदविण्यात आले.

आरोपीचा असा बचाव आहे की, फिर्यादी त्याचे चुलते असुन त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद असल्याने फिर्यादीने त्यांच्याविरुध्द खोटी केस केलेली आहे. त्यानेदेखील फिर्यादीविरुध्द एक फिर्याद दाखल केलेली आहे. आरोपीने त्याचे बचावाकरीता कोणताही साक्षीदार तपासला नाही.

०७. अभियोगपक्षाकरिता मी मा. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे यांचा व आरोपी करिता मा. विधीज्ञ श्री. एम. सी. खंडारे यांचा युक्तिवाद ऐकला.

०८. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा व बचावपक्षाच्या वतीने करण्यात आलेले युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे निर्णयाकरिता येतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबित करतो काय की, दिनांक १४/०७/२०१८ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताचे सुमारास फिर्यादी श्रीकृष्ण विठ्ठल ढिलोरकर हे यावर्डी येथील शेतातून येत असताना आरोपीने फिर्यादीला अन्यायाने प्रतिबंध केले व भारतीय दंड संहितेचे कलम ३४१ अन्वये गुन्हा केला? | **नाही** |
| २. | अभियोगपक्ष शाबित करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला डोक्यात जोरात बुक्की मारली व नालीत पाडले, लाथाबुक्यांनी मारले, तसेच विट मारण्याचा प्रयत्न करुन इच्छापुर्वक दुखापत केली व भारतीय दंड संहितेचे कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्ष शाबित करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी 'हरामखोर, फोकणीच्या' अशी इतरांना त्रास होईल अशा प्रकारे अश्लील भाषेत शिवीगाळ केली व भारतीय दंड संहितेचे कलम २९४ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही** |
| ४. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली व भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही** |
| ५. | आदेश काय? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले** |

**!! का र ण मी मां सा !!**

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबत :–**

०९. भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२३, २९४ व ५०६ नुसार आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाला हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने फिर्यादीला अन्यायाने प्रतिबंध केले, डोक्यात जोरात बुक्की मारली व नालीत पाडले, लाथाबुक्या मारल्या, तसेच विट मारण्याचा प्रयत्न केला, 'हरामखोर, फोकणीच्या' अशा अश्लील भाषेत शिवीगाळ केली व फौजदारीपात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली.

१०. सा. क्र. ०१ श्रीकृष्ण ढिलोरकर फिर्यादी यांच्या सरतपासात असे

आले आहे की, दिनांक १४/०७/२०१८ रोजी संध्याकाळी ते शेतातुन डवरणी करुन प्रविण ठाकरे याचेसोबत परत येत असताना संध्याकाळी ०५.३० वाजण्याच्या सुमारास आरोपीने अचानक त्यांच्या अंगावर येवुन त्यांच्या डोक्यात बुक्की मारुन त्यांना नालीत पाडले. आरोपीने त्यांना मारण्यास विट घेतली असता त्यांनी ती विट एका हाताने धरली. त्यावेळी आरोपीने त्यांना 'हरामखोर, फोकणीच्याहो, तीन दिवसात तुझा व तुझ्या घरच्यांचा खात्मा करतो' अशी वारंवार धमकी दिली. तेथे असलेल्या लोकांनी भांडण सोडविले. परंतु आरोपी पुन्हा त्यांच्या अंगावर आला व त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली.

११. सदर साक्षीदाराच्या उलटतपासात असे आले आहे की, आरोपी त्यांचा पुतण्या असुन आरोपीचे वडील त्यांचे मोठे भाऊ होते. आरोपीचे वडील व ते असे पाच भाऊ होते. त्यांच्या वडीलांनी विकत घेतलेल्या १९ एकर शेतीची त्यांच्यामध्ये वाटप झालेले असुन त्यांच्या हिस्याला ४ एकर शेतजमीन आलेली आहे. त्यानंतर त्यांनी २ एकर शेती विकत घेतली. आरोपीच्या वडीलांनी ८ एकर २६ गुंठे जमीन त्याच्या स्वतःच्या नावाने करून घेतली होती. त्यांचे व आरोपीचे संबंध चांगले नाही. मात्र सदर साक्षीदाराने त्याने जबरदस्तीने आरोपीच्या वडीलांच्या घराच्या जागेवर त्याचे स्वतःचे घर बांधल्याचा, ते स्वतः सिमेंट रस्त्यावर पडून त्यांना दुखापती झाल्याचा व त्यांच्या सरतपासातील नमुद कोणतीही घटना घडली नसल्याचा आरोपीचा बचाव नाकारलेला आहे. सदर तथाकथीत घटना यावर्डी येथे शिवाजी चौक येथे घडल्याचे सदर साक्षीदाराच्या जबानी रिपोर्टमध्ये नमुद नाही.

१२. सा. क्र. ०२ सुरेश आनंदराव कदम, सा. क्र. ०३ प्रविण पुंडलिकराव ठाकरे व सा. क्र. ०६ गणेश खटेश्वर पारे, सर्व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, या तिघांनीही त्यांच्यासमक्ष फिर्यादमधील नमुद घटना घडल्याचे नाकारले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाकार्य करत नसल्यामुळे मा. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासासारखे सूचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही.

१३. सा. क्र. ०४ मोहन आनंदराव कदम यांनी दिनांक १५/०७/२०१८ रोजी पोलिसांनी त्यांच्यासमक्ष शिवाजी चौक यावर्डी येथे फिर्यादमधील नमुद घटनेच्या ठिकाणाचा घटनास्थळ पंचनामा केल्याचे नाकारलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाकार्य करत नसल्यामुळे मा. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासासारखे सूचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदारानेदेखील अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही.

१४. सा. क्र. ०५ सुभाष सोनोने, पो. हे. कॉ., तपासी अधिकारी यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, दिनांक १४/०७/२०१८ रोजी ते कारंजा ग्रामीण पोलिस स्टेशन येथे रात्री २०.०० ते सकाळी ०८.०० वाजेपर्यंत स्टेशन डायरी अंमलदार म्हणुन कर्तव्यावर असताना फिर्यादी सा. क्र. ०१ हे लेखी फिर्याद घेवुन आले होते. त्यांनी सदर नि. क्र. २४ वरिल फिर्याद नोंदवुन घेतली व त्यावरुन गु.रं.क्र. ६३/२०१८ भारतीय दंड संहिता कलम ३४१, २९४, ३२३ व ५०६ करिता नि. क्र. २५ वरिल प्रथम खबर अहवाल नोंदवुन घेतला. नंतर त्यांनी नि. क्र. ३६ वरिल जखमी फॉर्म देवुन फिर्यादीला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, कारंजा येथे पाठविले.

१५. सदर साक्षीदाराने उलटतपासात जखमी फॉर्म क्र. ३६ वर गुन्हा क्रमांक नमुद नसल्याचे मान्य केले आहे. मात्र सदर साक्षीदाराने गुन्ह्याबाबत कोणतीही चौकशी न करता लेखी फिर्याद दाखल करुन घेवुन गुन्हा नोंदविल्याचा आरोपीचा बचाव नाकारलेला आहे.

१६. संबंधित पोलिस स्टेशनने सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी शेषराव जाधव, पो. हे. कॉ. हे दिनांक ०५/०९/२०२५ रोजी मयत झाल्याबाबत नि. क्र. ३४ वर अहवाल दाखल केला. आरोपीच्यावतीने फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र नि. क्र. ३८ मान्य करण्यात आले.

१७. अभियोगपक्षाच्या वरील पुराव्यावरुन असे दिसते की, आरोपी व फिर्यादी हे सख्खे चुलते–पुतणे असुन त्यांच्यात शेतीच्या कारणावरुन वाद असुन

त्यांचे संबंध चांगले नाही. फिर्यादीने घटनेच्यावेळी त्याच्यासोबत सा. क्र. ०३ प्रविण असल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर प्रत्यक्षदर्शी सा. क्र. ०३ प्रविण याने त्याचेसमक्ष फिर्याद नि. क्र. २४ मधील नमुद घटना घडल्याचे नाकारलेले आहे. फिर्याद नि. क्र. २४ मध्ये घटनेच्यावेळी घटनेच्या ठिकाणी सा. क्र. ०२ सुरेश घटनेच्या ठिकाणी हजर असल्याचे नमुद आहे. परंतु सदर साक्षीदारानेदेखील त्याचेसमक्ष नमुद घटना घडल्याचे नाकारलेले आहे. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला तिसरा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, सा. क्र. ०६ गणेश, यानेदेखील त्याचेसमक्ष नमुद घटना घडल्याचे नाकारलेले आहे. सा. क्र. ०४ मोहन यानेदेखील दिनांक १५/०७/२०१८ रोजी पोलिसांनी त्यांच्यासमक्ष शिवाजी चौक यावर्डी येथे फिर्यादमधील नमुद घटनेच्या ठिकाणाचा घटनास्थळ पंचनामा केल्याचे नाकारलेले आहे. सा. क्र. ०५ सोनोने, दाखल अधिकारी यांनीदेखील उलटतपासात जखमी फॉर्म नि. क्र. ३६ वर गुन्हा क्रमांक नमुद नसल्याचे मान्य केलेले आहे. आरोपीचा असा बचाव आहे की, फिर्यादी त्याचे चुलते असुन त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद असल्याने फिर्यादीने त्यांच्याविरुध्द खोटी केस केलेली आहे. त्यानेदेखील फिर्यादीविरुध्द एक फिर्याद दाखल केलेली आहे.

१८. वरिल परिस्थितीत अभिलेखावर घटनेबाबत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून केवळ सा. क्र. ०१ फिर्यादी यांचाच पुरावा उपलब्ध आहे. फिर्यादी व आरोपी हे सख्खे चुलते–पुतणे असुन त्यांच्यामध्ये शेतजमीनीवरुन व घराच्या कारणावरून वाद आहे. सर्व निष्पक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी त्यांच्यासमक्ष फिर्यादीतील नमुद घटना घडल्याचे नाकारलेले आहे. पंच साक्षीदाराने त्याचेसमक्ष घटनास्थळ पंचनामा केल्याचे नाकारलेले आहे. सा. क्र. ०५ सोनोने, दाखल अधिकारी यांच्या पुराव्यातदेखील आरोपीविरूध्द गुन्हा शाबित करण्यासाठी काहीएक सबळ पुरावा आलेला नाही. सा. क्र. ०२ ते ०६ यांच्या पुराव्यावरुन व आरोपीच्या बचावावरुन आरोपीने फिर्यादीला रस्त्यात अडवुन मारहाण करून सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली याबाबत अभिलेखावर निःसंशय पुरावा आलेला नाही. त्यामुळे

युक्तीवादाकामी फिर्यादीला नि. क्र. ३८ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रामधील नमुद दुखापत झाल्याचे मान्य केले तरी ती दुखापत होण्यास आरोपी कारणीभुत होता हे निःसंशयपणे शाबित होत नाही. अभिलेखावर फिर्यादीच्या पुराव्यास सहाय्यक ठरेल असा कोणताही सबळ पुरावा आलेला नाही. अशा परिस्थितीत फिर्यादीचा पुरावा पुर्णपणे विश्वासाहार्य वाटत नाही. फिर्यादीचा पुरावा व आरोपीचा बचाव यावरुन फिर्यादीतील नमूद घटना घडली होती किंवा नाही याबाबत शाशंकता निर्माण होते.

१९. फौजदारी खटल्याचा हा सुवर्ण नियम आहे की, ज्यावेळी अभिलेखावरील पुरावा आरोपीने गुन्हा केलेला आहे व आरोपीने गुन्हा केलेला नाही अशा दोन्ही शक्यता दर्शवितो त्यावेळी आरोपीस सहाय्यक ठरेल असे अनुमान काढणे योग्य ठरते. अशा परिस्थितीत आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतो. प्रस्तुत केसमध्येदेखील अभिलेखावर आरोपीने फिर्यादीला रत्यात अडवुन सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली याबाबत निःसंशय पुरावा आलेला नाही. त्यामुळे सदर केसमध्येदेखील आरोपी संशयाचा फायदा मिळणेस पात्र आहे. अशा परिस्थितीत आरोपीला भा.दं.सं. कलम ३४१, ३२३, २९४ व ५०६ च्या अपराधाकामी दोषी धरता येणार नाही. सबब, मुद्दा क्र. ०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ०५ बाबत :–</u>**

२०. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द असलेला दोषारोप सबळ पुराव्याअभावी संशयापलिकडे सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपीस संशयाचा फायदा मिळणे न्यायोचित ठरते. जोपर्यंत आरोपीविरुध्द आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत कायदा आरोपीस निरपराध समजतो. आरोपीचा तो संविधानात्मक हक्कही आहे. त्यामुळे आरोपी सदर गुन्ह्यातून मुक्त होण्यास पात्र आहे.

२१. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पुर्ततेकामी

जामीन दिलेला आहे. सबब, मुद्दा क्र.०५ करिता खालील आदेश पारित करित आहे.

## आ दे श

१. आरोपी गणेश सुरेश ढिलोरकर यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३४१, ३२३, २९४ व ५०६ अन्वयेच्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे पूर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ चे पुर्ततेकामी दिलेले जामीन बंधपत्र खटल्याच्या न्यायनिर्णयापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.07.28 17:23:22 +0530

**(पी. डी. देवरे)**

दिनांक: २८/०७/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा (लाड)

# भाग 'क'

## अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीकृष्ण विठ्ठलराव ढिलोरकर | फिर्यादी | २३ |
| ०२ | सुरेश आनंदराव कदम | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | २९ |
| ०३ | प्रविण पुंडलीकराव ठाकरे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ३० |
| ०४ | मोहन आनंदराव कदम | पंच साक्षीदार | ३१ |
| ०५ | सुभाष तुळशिराम सोनेने | दखल अधिकारी | ३५ |
| ०६ | गणेश खटेश्वर पारे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ३७ |

## ब. बचाव पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## क. न्यायालयाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## अ. अभियोग पक्षाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १. | फिर्याद | २४ |
| २. | प्रथम खबर अहवाल | २५ |
| ३. | दिनांक १४/०७/२०१८ रोजीचा जखमी फॉर्म | ३६ |
| ४. | फिर्यादी श्रीकृष्ण विठ्ठलराव ढिलोरकर यांचे | ३८ |

| | | |
|---|---|---|
| | वैद्यकीय प्रमाणपत्र | |

## ब. बचाव पक्षाची निशाणी यादी

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## क. न्यायालयाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १. | दोषारोपपत्र | ०१ |
| २. | वकीलपत्र | ०२ |
| ३. | दोषारोप | १० |
| ४. | आरोपीचे निवेदन | ११ |
| ५. | आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे निवेदन | ४० |

## ड. वस्तु/ मुद्देमाल यादी

| अनु.क्र. | वस्तु/ मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.07.28 17:23:31 +0530

**(पी. डी. देवरे)**

दिनांक: २८/०७/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा (लाड)

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word to word as per the original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | **Shivam B. Patange (L.G.)** |
| Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Karanja. |
| Date of Judgment | :- | 28.07.2026 |
| Judgment signed by P.O. | :- | 28.07.2026 |
| Judgment uploaded on | :- | 28.07.2026 |